माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक -११७६-२०२४ /सोलापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| संजय गोवर्धन चव्हाण | जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक मुख्य अभियंता (विप्र )जलसंपदा विभाग पुणे १ | मुख्य अभियंता (विप्र ) जलसंपदा विभाग,पुणे -१. |

(निर्णय दिनांक- २०/०५/२०२५)

तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारी मध्ये 'आयोगाचे आदेश पारित होवूनही कोणतीही माहिती मिळाली नाही ' अशा आशयाची तक्रार आयोगाकडे केलेली आहे.

आयोगाने द्वितीय अपील क्रमांक- ४८७३ /२०२१ /पुणे यामध्ये दिनांक-८.१.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर उपलब्ध असलेल्या अभिलेखावरून असे स्पष्ट होते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक मुख्य अभियंता (विप्र )जलसंपदा विभाग पुणे यांनी वर नमूद द्वितीय अपीलामध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार सदरचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात कार्यवाही करावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

आदेश

वरील निर्देशासह तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ सत्यमेव जयते

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक -११७६-२०२४ /सोलापूर 7988/2025

दिनांक - 2/6/2025